**निशाणी क्रमांक ६ खालील आदेश**

सदर अर्जाचे अवलोकन केले. सदर अर्जावर ऋणको तर्फे म्हणणे सादर करण्यात आले नाही. सदर अर्ज धनकोने दिनांक ०६/०८/२०२१ रोजी दाखल केला. आज सदर अर्ज सुनावणीसाठी प्रलंबित आहे. धनको व त्याचे वकिल यांचा आज वारंवार पुकारा केला असता, ते गैरहजर. धनकोने सदर नियमित दरखास्त सन २०१६ मध्ये दाखल केले असुन नि.क्र. ५ च्या अर्जाप्रमाणे ऋणको विरूध्द जंगम जप्ती वॉरंट काढण्याचा अर्ज दिनांक ०५/०१/२०१७ रोजी दिला. सदर अर्जावर त्याच दिवशी आदेश पारीत होवुन सदर अर्ज मंजुर करण्यात आला व ऋणको विरूध्द जंगम जप्ती वॉरंट योग्य ती प्रोसेस फी लावुन काढण्यात यावे असे धनकोला आदेशीत केले. सदर आदेशाची पुर्तता धनकोने दिनांक ०६/०८/२०२१ पर्यत केली नाही. सदर अर्जाद्वारे धनकोचे म्हणणे की, नि.क्र. ५ च्या आदेशाची पुर्तता करण्याकरीता ऋणकोला परत नोटीस काढावी. सदर प्रकरणाची बाब पाहता धनकोने सदर प्रकरणात वेळोवेळी कोणतेही कार्यवाही केली नाही. नि.क्र. ५ वर दिनांक ०५/०१/२०१७ रोजी आदेश होवुनही धनकोने सदर आदेशाची पुर्तता केली नाही. यावरून धनकोला सदर प्रकरण चालवण्यात रस नाही असे दिसुन येते. करीता धनकोचा सदर नि.क्र. ६ चा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by SWATI VIJAYANAND PHULBANDHE
Date: 2021.12.10 16:35:33 +0530

**(श्रीमती एस. व्ही. फुलबांधे)**

दिनांक — १०.१२.२०२१ सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), वाशिम.

निकालाची तारीख - १०.१२.२०२१
सही केल्याची तारीख - १०.१२.२०२१
अपलोड केल्याची तारीख - १०.१२.२०२१

<u>प्रमाणपत्र</u>

मी, शपथेवर निवेदन करतो की, प्रस्तूत पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा शब्द न शब्द मुळ आदेश / न्यायनिर्णय प्रमाणे बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव - एम. एस. ताकवाले, लघुलेखक (नि.श्रे.)

न्यायालयाचे नाव - सह दिवाणी न्यायाधीश (व–स्तर), वाशिम.

स्वाक्षरीत/-
लघुलेखकाची सही